RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ९, अंक ११] गुरुवार, फेब्रुवारी २३, २०२३/फाल्गुन ४, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक १७

प्राधिकृत प्रकाशन

### बृहन्मुंबई महानगरपालिका

No. A.C.K/E/4717/AE(M)/Gen

### सार्वजनिक सूचना

**बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २९७ (१) (ब) अन्वये के/पूर्व विभागातील टी. पी. एस. II, विलेपार्ले (पूर्व) येथील अंतिम भुखंड क्र. ५५, ५६, ५७, ५८, १०५ आणि १०६ यांच्या लगत अस्तित्वात असणाऱ्या ५.८० मीटर रुंदीच्या टीपी रस्त्यास ९.०० मीटर रुंदीची रस्ता रेषा विहित झालेली असून सदरहू विहित रस्तारेषेस सुधारणा करणेबाबत.**

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ ( आजतागायत सुधारित ) च्या कलम २९७ ( १ ) ( ब ) अन्वये खालीलप्रमाणे जाहीर सूचना देण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/ पूर्व विभागातील टी. पी. एस. II, विलेपार्ले ( पू ) मधील अंतिम भुखंड क्र. ५५, ५६, ५७, ५८, १०५ आणि १०६ यांना लगत अस्तित्वात असणाऱ्या ५.८० मीटर रुंदीच्या टिपी रस्त्यास ९.०० मीटर रुंदीची विहित रस्ता रेषा मंजूर झालेली असून त्यात सुधारणा करणेचा प्रस्ताव, महापालिकेच्या सभेमध्ये, सदर सूचना प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या नंतर येणाऱ्या किंवा जेंव्हा केंव्हा सदरहु प्रस्ताव निकालात काढता येईल, अशा महापालिकेच्या सभेत मांडण्यात येईल.

के/पूर्व विभागातील सदर रस्ता हा विलेपार्ले टी. पी. एस. II नुसार सद्यपरिस्थितीत ५.८० मी. रुंदीचा आहे. उल्लेखित रस्त्याची रुंदी बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ ( आजतागायत सुधारित ) च्या कलम २९७ ( १ ) ( ब ) अन्वये ९.०० मीटर रुंदीची विहित नियमीत रेषा मंजूर झालेली आहे. सदरहू मंजूर झालेल्या विहित ९.०० मीटर विहित रस्ता रेषेस सुधारित करण्याचे प्रस्ताविले आहे. नगरविकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४, नियम १९( ३ ) टिप नं. १ च्या अनुषंगाने आणि महापालिका आयुक्त यांच्या क्र. CHE/DP/73/Gen/2019-20 च्या परिपत्रकान्वये ९.०० मीटर अथवा त्यापेक्षा अधिक रुंदीकरण करण्याचे निर्देशित केले आहे.

मा. महानगरपालिका आयुक्त यांनी मंजुरी क्र. एमसीपी/३३१९, दिनांक ७ फेब्रुवारी २०२३ अन्वये तत्वतः मंजूर केलेली सुधारित ९.०० मीटर रस्ता रेषा नकाशावर हिरव्या रंगात दर्शविलेली आहे आणि प्रस्तावित सुधारित ९.०० मीटर रुंदीची रस्ता रेषा सुधारणा लाल रंगात दर्शविलेली आहे. सदर नकाशा सहायक अभियंता ( सर्वेक्षण ) एच व के विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, त्यांचा कार्यालयीन पत्ता पुढीलप्रमाणे आहे. उपप्रमुख अभियंता ( इ.प्र. ) प.उप.-१ यांचे कार्यालय, 'हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे मंडई', ६ वा मजला, नविन मजास मार्केट, पूनम नगर, मजास गांव, जे. व्ही. लिंक रोड समोर, जोगेश्वरी ( पूर्व ), मुंबई ४०० ०९३ व सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांच्या के/पूर्व विभाग कार्यालय इमारत, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी ( पूर्व ), मुंबई ४०० ०६९, येथील कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

ज्या कोणास उपरोक्त प्रस्तावाबाबत प्रतिनिवेदने / हरकती पाठवावयाच्या असतील तर त्यांनी त्या उपप्रमुख अभियंता (इ. प्र.) प.उप.-१ यांचे कार्यालय, ‘हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे मंडई’, ७ वा मजला, नविन मजास मार्केट, पूनम नगर, मजास गांव, जे. व्ही. लिंक रोड समोर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३, अथवा सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांच्या के/ पूर्व विभाग कार्यालय इमारत, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९, येथील कार्यालयात सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत (सार्वजनिक व साप्ताहिक सुट्टीसह) प्राप्त होतील अशाप्रकारे पाठवाव्यात. त्यानंतर प्राप्त झालेली प्रतिनिवेदने / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२३,
PRO/2925/ADV/2022-23.

**सुनिल राठोड,**
उपप्रमुख अभियंता (इ. प्र.) प. उप.-१ .

## BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

No. A.C.K/E/4717/AE(M)/Gen

**Public Notice**

**Proposal for modification of 9.00 mtr. wide sanctioned R.L. to TP Road abutting to FP 55, 56, 57, 58, 105 and 106 of TPS II, Vile Parle (East), Andheri in K/East Ward Mumbai under section 297(1) (b) of MMC Act, 1888.**

Notice is hereby given pursuant to section 297(1)(b) of MMC Act, 1888 (as mentioned up to date) that, the undersigned proposes to apply to the Municipal Corporation at their meeting to be held after 30 days from display of this Public Notices or such day thereafter, as the said application can conveniently be disposed off for authority to accept proposed modification to 9.00 mt. wide Regular Line of existing TP road abutting to FP 55, 56, 57, 58, 105 and 106 at Nariman Road, TPS V, Vile Parle (East), Andheri in K/East Ward.

The width of said road is 5.80 mt. and same is sanctioned for 9.00 mt. R.L. under section 297(1)(b) of MMC Act, 1888 and modification is proposed, as per Note 1 of Regulation 19(3) of DCPR 2034 and as per subsequent circular of Hon'ble Municipal Commissioner u/No. CHE/DP/73/Gen/2019-20, directing to widen the roads of width less than 9.00 mt. and above, as per site condition through MR & TP or MMC Act.

The plan showing proposed 9.00 mt. Wide Regular Line approved in principal by Hon'ble Municipal Commissioner u/No. MCP/3319, dated 7th February 2023, as shown in green colour marked and proposed modification is shown in red colour is available for inspection in the office of Assistant Engineer (Survey) W.S.-I, whose office is situated at 6th floor, Hindu Hrudaysamrat Shri Balasaheb Thakre Market at New Majas, Poonam Nagar, J.V.Link Road, Jogeshwari (E), Mumbai 400 093 and in the office of Assistant Commissioner, K/East Ward whose office address is as K/East Ward Office Building, Azad Road, Gundavali, Andheri (East), Mumbai 400 069.

Any person desirous of making any representation to the Corporation or bringing before the corporation any suggestion/ objection in respect of the said proposal may do so by letter addressed to Dy.Ch.E.(B.P.) W.S.-I whose office address is as 7th floor, Hindu Hrudaysamrat Shri Balasaheb Thakre Market at New Majas, Poonam Nagar, J.V.Link Road, Jogeshwari (E), Mumbai 400 093 or to Assistant Commissioner, K/East Ward whose office address is as K/East Ward Office Building, Azad Road, Gundavali, Andheri (East), Mumbai 400 069 and deliver at the said offices within 30 days from the publication of this notice (including Holidays and weekly off). The letter received after such date, cannot be considered, which please be noted.

Dated the 23rd February 2023, SUNIL RATHOD,

PRO/2925/ADV/2022-23. Dy. Ch. Engineer (B.P.) W.S.-I.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.